# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १४/०८/२०२४ (बुधवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन पारशिवनी, अरोली येथील अधिकारी व अंमलदार व शाळेतील विदयार्थ्यांनी संयुक्तपणे राबविले घरोघरी तिरंगा मोहिम

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता पोलीस स्टेशन पारशिवनी येथे केसरीमल पालीवाल विद्यालय पारशिवनीचे विद्यार्थ्यांना बोलावून **घरोघरी तिरंगा** मोहिमेंतर्गत स्वातंत्र्यदिनानिमित्त पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजाची माहिती देऊन शस्त्राची माहिती देण्यात आली. तसेच स्वातंत्र्य लढ्यातील विरांविषयी माहिती देऊन देशप्रेम जागविले. सदर कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

तसेच अरोली पोलीसांनी अरोली येथील समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे घरोघरी तिरंगा मोहिम अंतर्गत स्वातंत्र्यदिनानिमित्त उपस्थित विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधला, तसेच समाजातील वागणूक संबंधाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजाची माहिती देऊन स्वातंत्र्य लढ्या संदर्भात माहिती देऊन देशप्रेम भावना जागृत करण्यात आली. तसेच शैक्षणिक दृक साधनाचे विमोचन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला २०० ते २५० विद्यार्थी हजर होते.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर